CNR No. MHWR030013302026
सं.फौ.ख.क्र. ७४४/२०२६
शासन विरूध्द नाना ठाकरे
निशाणी क्रमांक 03

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (फौजदारी न्यायालय क्र. १) वर्धा, यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी : विक्रांत. प्र. खंदारे)

## गुन्हयाचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| १. अपराधाचा दिनांक | : | ०४/०२/२०२६ |
| २. फिर्याद दाखल दिनांक | : | ०४/०२/२०२६ |
| ३. फिर्यादीचे नाव | : | पोलीस स्टेशन अधिकारी, वर्धा षहर पोलीस स्टेशन, जि. वर्धा. |
| ४. आरोपीचे नाव | : | नाना चंपतराव ठाकरे , वय :५० वर्षे, धंदा : मजुरी., रा आदिवासी कॉलनी, कारला चौक, वर्धा जि. वर्धा. |
| ५. कायदयाचे नाव व कलम | : | महाराष्ट्र प्रतिबंध कायदयाचे कलम ८५(१) प्रमाणे. |
| ६. गुन्हयाचा तपशील | : | |

दिनांक ०४/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०७:३० वाजताच्या सुमारास मौजा स्टेषनफैल वर्धा जि. वर्धा येथे तुम्ही सार्वजनिक चौकात दारूच्या नशेत आरडाओरड करुन शांतता भंग करतांना मिळून आले. त्यामुळे तुम्ही माझे अख्त्यारीत महाराष्ट्र प्रतिबंध कायदयाचे कलम ८५(१) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

करीता तुमचेविरूध्द या न्यायालयात खटला चालविण्यात येतो.

दिनांक : २४/०३/२०२६
वर्धा.

(विक्रांत प्र. खंदारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

७. **आरोपीचे प्रतिवेदन**

प्रश्न क्र. १ : तुम्हाला खटल्यामधील चालानाच्या नकला मिळाल्या का ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. २ : तुम्हाला वाचून व समजावून सांगितलेला गुन्हयाचा तपशिल समजला काय ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. ४ : तुम्हाला गुन्हा कबूल केल्यास आता समजाविल्याप्रमाणे कारावास, दंड किंवा दोन्हीही होवू शकतो हे तुम्हाला समजले काय ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. ५ : तसेच सदर गुन्हा कबूल केल्यास तुम्ही प्रस्तुत प्रकरणाच्या आदेशास आव्हान देउ शकणार नाही अथवा त्या विरुध्द अपील दाखल करु शकणार नाही हे तुम्हाला समजले काय ?
उत्तर : होय.
प्रश्न क्र. ६ : तुम्हाला तरीही गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : होय.

न्या. दं. प्र. वर्ग

आरोपीची सही

दिनांक : २४/०३/२०२६
वर्धा.

माझे समक्ष

(विक्रांत प्र. खंदारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

## आदेश

८. आरोपीविरूध्द गुन्हयाचा तपशिल ठेवतांना व त्याचे प्रतिकथन नोंदवितांना आरोपीने त्याला सदर गुन्हा कबुल असल्याचे निवेदन नोंदविले आहे. त्याबाबत त्याने पुरसीस सुध्दा दाखल केलेली आहे. आरोपी स्वमर्जीने, कोणत्याही दडपणाखाली न येता गुन्हा कबुल करीत असल्याची खात्री करून त्याचे गुन्हा कबुलीचे प्रतिकथन मान्य करण्यात येते. त्यानुसार आरोपीला महाराष्ट्र प्रतिबंध कायदयाचे कलम ८५(१) च्या शिक्षापात्र गुन्हयाकरीता दोषी ठरविण्यात येते.

९. अभियोगपक्षातर्फे विदवान सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने निवेदन केले आहे की, हा त्याचा पहिलाच गुन्हा असून तो त्याचे घरामध्ये एकटाच कमावता असून कुटूंबाची सर्वस्व जबाबदारी त्याच्यावर आहे. तसेच तो अत्यंत हलाखीचे जीवन जगत असून त्याला रोजगाराची आबाळ आहे. त्यामुळे किमान दंड रक्कमेची शिक्षा देण्याची विनंती केली.

१०. सार्वजनिक रस्त्यावर आरडाओरड व धुमधाम करून शांतता भंग करणे हा समाजाविरूध्दचा गुन्हा आहे. अशावेळी आरोपीला शिक्षा न केल्यास त्याला या बाबीची जाणीव राहणार नाही आणि तो अशाच घटनांची पुनरावृत्ती करू शकतो. परंतु प्रस्तुत प्रकरणात कोणत्याही इसमास दुखापत झालेली नाही. तसेच आरोपीच्या सदर कृत्यामुळे कोणाचेही आर्थिक नुकसान झाल्याबाबत सुध्दा अभिलेखावर पुरावा नाही. त्यामुळे आरोपीने स्वत:हुन गुन्हा कबूल केल्याने आणि हा त्याचा पहिलाच गुन्हा असल्याने मा. सर्वोच्च न्यायालयाचे *मोहम्मद हासिम विरूध्द स्टेट ऑफ उत्तर प्रदेश व इतर, (2017) 2 SCC 198* मधील दृष्टांतांनुसार आरोपीला महाराष्ट्र प्रतिबंध कायदयाचे कलम ८५(१) मध्ये नमुद प्राविधानास अधिन राहून सौम्य शिक्षा देता येईल. करीता, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी नाना चंपतराव ठाकरे यास फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अन्वये महाराष्ट्र प्रतिबंध कायदयाचे कलम ८५(१) या शिक्षापात्र गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात येवून त्यास त्याकरिता न्यायालय उठेपर्यंत एक दिवसाचा साधा कारावास व रूपये ५००/— द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने द्रव्यदंड न भरल्यास ०१ दिवसाचा अतिरिक्त साधा कारावास भोगावा.

२. या आदेशाची प्रत आरोपीला त्वरीत विनामुल्य देण्यात यावी.

दिनांक : २४/०३/२०२६
वर्धा.

(विक्रांत प्र. खंदारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

प्रत विनामुल्य मिळाली.

(आरोपीची सही)

Received Amt. Of Rs. 500/-
(In Words Rs.) Five Hundred Only )Vide C.R./F.R./P.R./G.R. No. 554
as a Fine Amount

Sr. Clerk

न्या. दं. प्र. वर्ग